नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २८/०५/२०२६ (गुरूवार )

---

## मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांनी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन सावनेर येथे सुरक्षा व्यवस्थेची केली पाहणी

आज दिनांक २८/०५/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार , पोलीस अधीक्षक , नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील कुरेशी मोहल्ला, जामा मशिद तसेच शाही मशिद परिसरास भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी मशिद परिसरातील सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन, गर्दी नियंत्रण तसेच पोलीस बंदोबस्ताची माहिती जाणून घेतली. तसेच संवेदनशील ठिकाणी विशेष पोलीस बंदोबस्त ठेवण्यात यावा. मशिद परिसरात वाहतूक कोंडी होणार नाही यासाठी योग्य नियोजन करण्यात यावे या सारख्या महत्त्वाच्या सुचना देण्यात आल्या. तसेच सदरवेळी मा.पोलीस अधीक्षकांनी स्थानिक मुस्लीम बांधवांसोबत संवाद साधुन बकरी ईद सण शांततेत व सामाजिक सलोखा राखून साजरा करण्याचे आवाहन केले.

सदर भेटी दरम्यान श्री सागर खर्डे, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी सावनेर उपविभाग आणि पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर हजर होते.







## नागपुर ग्रामीण जिल्हयात बकरी ईद बंदोबस्त यशस्वीरित्या आणि शांततेत पार पडला.

दिनांक २८/०५/२०२६ रोजी बकरी ईद (ईद—उल—अजहा) निमित्याने नागपुर ग्रामीण जिल्हयात एकुण ११० ठिकाणी मुस्लीम बांधवाचे नमाज पठण पार पडले. बकरी ईद निमित्य नागपुर ग्रामीण जिल्हयात मा. श्री. हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कडेकोट बंदोबस्त लावण्यात आलेला होता.

सदर बंदोबस्तात नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी यांनी आपआपल्या उपविभागाात नेमुन दिलेल्या स्ट्रायकींग फोर्स सहीत सतर्क पेट्रोलीग केली तसेच सर्व ठाणे प्रभारी अधिकारी आणि त्यांचे अधिनिस्त अधिकारी/अंमलदार यांनी त्यांना नेमुन दिलेले कर्तव्य काटेकोरपणे पार पाडले. जिल्हा विशेष शाखा नागपुर ग्रामीण आणि सर्व २३ पोलीस स्टेशन यांनी योग्य बंदोबस्त आखला होता. जिल्हयात ६ उपविभागात ६ उपविभागीय पेट्रोलींग पथक आणि संपुर्ण परीसरात १ पेट्रोलींग पथक नेमण्यात आले होते. २ दंगानियंत्रण पथक, गृहरक्षक यांचा सुध्दा बंदोबस्तामध्ये समावेश होता. विशेष ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आले होते. अतिसंवेदनशिल भागांमध्ये प्रभावी नजर ठेवण्यासाठी प्रत्येक उपविभागात एक

Surveillance Van तैनात करण्यात आली होती. **तसेच नागपुर ग्रामीण जिल्हयातील सायबर पोलीस स्टेशन तसेच २३ पोलीस स्टेशन यांनी बारकाईने सोशलमिडीया वर सतत्याने लक्ष ठेवुन मॉनिटरींग केले.**

**अशा प्रकारे नागपुर ग्रामीण जिल्हयात बकरी ईद (ईद—उल—अजहा) चा उत्सव शांततेत पार पडला.**

## केबल चोरीचे ५ गुन्हे उघड, ५ आरोपी अटक, २ दुचाकी वाहन, रोख रक्कमेसह एकुण २ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त,स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उघड न झालेलया गुन्हयांचा तपास करीत असतांना कळमेश्वर हद्दीतील केबल चोरीच्या गुन्हयात दिनांक २७/०५/२०२६ रोजी तांत्रिक पुराव्यावरून मोटर सायकल क. एम एच ४० /सी डब्ल्यु २२६७ या वाहनाचा गुन्हा करण्यासाठी वापर झाल्याचे निष्पन्न केले.नमुद मोटर सायकल मालक **आरोपी क्रं १) चेतन प्रकाश अतकरी, वय २५ वर्षे रा. आदर्श नगर, वाडी, प्रगती कन्या शाळेचे मागे, नागपुर** याला ताब्यात घेतले. नमुद आरोपीला ताब्यात घेवुन त्याच्याकडे कौशल्यपुर्ण तपास करीत असतांना पोलीसांनी **आरोपी क्रं २) जय अशोक वघारे वय ३३ वर्षे रा. प्लॉट न.१३७, वार्ड क. ०३, टेकडी वाडी श्रीकृष्ण मंदीर जवळ, खडगाव रोड वाडी, क्रं ३) आकाश मुन्नालाल पवार, वय ३१ वर्षे रा. बरारू ता.जि. सागर पोलीस ठाणे केट (मध्यप्रदेश) ह.मु. विश्वास नगर राधाकृष्ण मंदीर जवळ काटोल रोड गिटीखदान नागपुर, क्रं ४) उमेश चिंदुजी फरकाळे, वय ३२ वर्षे रा जामठी गणेशपुर ता वरूड जि.अमरावती ह.मु. गायत्री कॉलनी शिवनगर राज अवर मानकापुर नागपुर गिरधारी वारंगे चे घरी किरायाने, क्रं ५) मंगेश प्रकाश सिंगारे, वय ४३ वर्षे रा. प्लॉट न.४२८ ओम नगर नेहरू नगर कार्पोरेशन ऑफीस जवळ सक्करदरा नागपुर** या आरोपीतांचा गुन्हयात सहभाग असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी सर्व आरोपींना ताब्यात घेत सखोल चौकशी केली असता त्यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर आणि कोंढाळी हद्दीत केबल चोरी करून त्यातील कॉपर वायर काढुन विक्री केल्याबाबत माहीती दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हा करण्याची वापरलेली मोटर सायकल एम एच ४० /सी डब्ल्यु २२६७ आणि , एम एच ४० सी एस ५२१३ आणि कॉपर तार विक्री करून मिळवलेले रोख रक्कम ९५,०००/— रूपये असा एकुण २,४५,०००/— रूपयांचा मुद्‌देमाल जप्त केला आहे. वर पाचही आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

**उघडकीस आणलेले गुन्हे खालीलप्रमाणे आहे.**

१). पो.स्टे. कळमेश्वर अप.क. ५५८/२६ कलम ३०३(२),३२४(४),६२,३(५) भान्यासं

२). पो.स्टे. कळमेश्वर अप.क. २५३/२६ कलम ३०३(२)भान्यासं

३). पो.स्टे. कळमेश्वर अप.क. २९७/२६ कलम ३०३(२)भा.न्या.सं. ,

४). पो.स्टे. कळमेश्वर अदखलपात्र अप.क. ७०/२६ कलम ३०३(२)भा.न्या.सं. ,

५). पो.स्टे. कोंढाळी अप.क. १६५/२६ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. ,

**असे एकुण ५ गुन्हे उघड झाले आहे.**



गुन्हे उघड करणारे पोलीस पथक जप्त मुद्द्देमालासह

# पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत सराईत गुन्हेगार चेतन विजय हेलोंडे, याला एमपीडीए कायदयाअंतर्गत केले स्थानबध्द

**पोलीस स्टेशन कळमेश्वर:—** पोलीस स्टेशन कळमेश्वरच्या अभिलेखावरील सराईत आरोपी नामे **चेतन विजय हेलोंडे, वय २६ वर्षे, रा. सावंगी तह. सावनेर, जि. नागपूर** याचे विरूध्द **साथीदारांसह गंभीर दुखापत पोहचविणे, रस्त्याने अडवणुक करणे, अश्लील शिवीगाळ करुन मारहाण करुन जिवाने मारण्याची धमकी देणे, अवैद्य दारु विक्री करणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन मारहाण करणे** या सारखे गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी हा असे गुन्हे करण्याच्या सवयीचा आहे. त्याच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये तो भय निर्माण करून दहशत पसरवित होता. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्याचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्याला अटक केले आहे. पोलीसांनी आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्याचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा आरोपीने आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच नमुद आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली कळमेश्वर पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी सराईत गुन्हेगार चेतन विजय हेलोंडे, वय २६ वर्षे, रा. सावंगी तह. सावनेर, जि. नागपूर याचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता कळमेश्वर पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दिनांक २७/०५/२०२६ रोजी त्याला तात्काळ ताब्यात घेतले नमुद आरोपीला अटक करून जिल्हा कारागृह नागपुर येथे दाखल करण्यात आले.**



**स्थानबध्द आरोपी चेतन विजय हेलोंडे**

## जनावरांना क्रुरतेची वागणुक देणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १० गोवंश जनावरांची सुटका, काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक २७/०५/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, संत्रा मंडी मार्केट, काटोल येथुन अवैधरित्या जनावरे भरून त्याची वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सापळा रचुन संत्रा मंडी मार्केट, काटोल येथे जावुन पाहणी केली असता दोन संशयित वाहन मिळुन आले. १) वाहन क्र. एम एच—४०/सी टी—८२३२ आणि २) महिंद्रा पिकअप वाहन क्र. एम एच—४०/सी एम—३५६७ या वाहनात गोवंश जनावरे भरतांना आरोपी दिसुन आले. तसेच काही जनावरे वाहनात भरले सुध्दा होते. **वाहन क्र. १) चा चालक साहिल सफीक सय्यद, वय २३ वर्ष, रा. फैलापुरा काटोल तसेच वाहन क्र. २) चा चालक पिलाजी लक्ष्मणराव काळसरपे, वय ४८ वर्ष, रा. घरतवाडा काटोल** हे मिळुन आले. सदर ठिकाणी लहान मोठे एकुण १० गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद आरोपींकडे जनावरांचा

वैदयकीय तपासणी परवन्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्या परवना नव्हता .नमुद आरोपींनी जनावरांना निर्दयतेची तसेच क्रुरतेची वागणुक दिल्याचे दिसुन आले. सुटका केलेल्या जनावरांना सती अनुसया माता गोशाळा, पारडसिंगा येथे देखभालीकरीता दाखल करण्यात आले.

**पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) दोन्ही वाहन किंमती १०,००,०००/—रूपये आणि दोन्ही वाहनातील १० गोवंश जनावरे किंमती १,२०,०००/—रूपये असा एकुण ११,२०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे. नमुद प्रकरणी १) साहिल सफीक सय्यद, वय २३ वर्ष, रा. फैलापुरा काटोल २) पिलाजी लक्ष्मणराव काळसरपे, वय ४८ वर्ष, रा. घरतवाडा काटोल यांचेविरूध्द २२३, ३(५) भान्यासं सह कलम ११(१) (ड) (ई) प्रा. छ. अधि. १९६० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार चालवणाऱ्यावर ०७ गुन्हे नोंद.

दिनांक २७/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन यांनी अवैधरित्या सट्टापट्टी तसेच ५२ ताशपत्त्याचा जुगार खेळणाऱ्या/खेळविणाऱ्या आरोपीतांवर छापा टाकुन ५२ ताशपत्ते, सट्टापट्टी साहित्य व रोख रक्कम असा एकुण ४३९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये एकुण ०७ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. ते खालीलप्रमाणे.

**पोलीस स्टेशन वेलतूर** येथे आरोपी नामे बंडु आत्माराम मानकर, वय ५१ वर्ष, रा. पचखेडी, ता. कुही, जि. नागपुर याचेवर अवैध सट्टापट्टी चा ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे १) शेख रमजान शेख लतीफ, वय ४० वर्ष, रा. उमाठे नगर, कोंढाळी २) गोलु उर्फ शहजाद गोलु मुस्ताफ शेख, वय ३३ वर्ष, शनिचरापेठ कोंढाळी ३) सुभाष सखाराम मंजुळकर, वय ५५ वर्ष, रा. पीएचसी रोड, कोंढाळी ता. काटोल यांचेवर ५२ तासपत्तयांचा जुगाराचा ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे विजय श्रीराम वानखेडे, रा. खापरी केने, ता. काटोल, जि. नागपूर याचेवर अवैध सट्टापट्टी चा ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे आरोपी नामे १) भिकम सहती कुर्मी, वय ६० वर्षे, रा. क्वा क्र ४४/४ सद्भावना कॉलोनी पाटणसावंगी सावनेर ,२) मिथून हजारीलाल यदुवंशी, वय ३२ वर्षे, रा. क्वा क्र ३७/२ सद्भावना कॉलनी,पाटणसावंगी ता सावनेर ,३)

आरोपी समीम अंसारी, रा. सद्‌भावना कॉलोनी पाटणसावंगी, ता. सावनेर ४) आरोपी निरज बाबासींग यादव, रा. कवडस सावनेर यांचेवर ५२ तासपत्तयांचा जुगाराचा ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी नामे अतुल मधुकर पोईलकर, वय ३१ वर्ष, रा. जुनीवस्ती बुटीबोरी याचेवर अवैध सट्‌टापट्‌टी चा ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी नामे १) स्वनील प्रकाश मेश्राम, वय २५ वर्ष, रा. मांडवा, ता. हिंगणा, जि. नागपुर २) रोशन सुदाकर धुर्वे, वय २९ वर्ष, रा. मांडवा, ता. हिंगणा, जि. नागपुर ३) आदित्य संतोष परतेकी, वय २६ वर्ष, रा. मांडवा, ता. हिंगणा, जि नागपुर यांचेवर ५२ तासपत्तयांचा जुगाराचा ०१ गुन्हा नोंद, **तसेच** आरोपी नामे शंशीकांत सदाशिव कांबळे, वय ३६ वर्ष, रा. टाकळघाट, ता. हिंगणा, जि. नागपुर याचेवर अवैध सट्‌टापट्‌टी चा ०१ गुन्हा नोंद.

## नागपूर ग्रामीण जिल्हयात अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये ०५ गुन्हे नोंद

दिनांक २७/०५/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयांतर्गत अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपींविरूद्ध खालीलप्रमाणे गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन काटोल** अंतर्गत पोलीस पेट्रोलींग करीत असतांना आरोपी १) अविनाश नारायण कुशवाह, वय रा. अर्जुन नगर काटोल २) आरोपी विशाल रमेश राउत, रा. मरामायनगर काटोल, जि. नागपुर ३) राजु गणेश गुप्ता, रा. मरामायनगर काटोल, जि. नागपुर हे मरामाय नगर काटोल येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आले. **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी शुभम मनोहर हिवसे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र २, नरखेड हा मौजा आठवडी बाजार नरखेड येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. **पोलीस स्टेशन कळमेश्वर** अंतर्गत आरोपी संदिप दिवाकर नेहारे, वय २६ वर्ष, रा. वार्ड क्र. ०३, कळमेश्वर हा मौजा कळमेश्वर शुभारंभ हॉलच्या मागे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमुद आरोपींवर कलम २७ एन.डी.पी.एस. कायदयान्वये ०५ गुन्हे नोंद करण्यात आले आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री,वाहतुक करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध १० गुन्हे नोंद

दिनांक २७/०५/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री,वाहतुक आणि सेवन करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू,वाहन असा एकुण ६६७०४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन कुही** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे आरोपी नामे खेमा किसन चव्हाण, वय ६५ वर्ष, रा. चाकडोह याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०२ महिला आणि आरोपी राजकुमार गुलाबराव गुरव, वय ५० वर्ष, रा. वार्ड नं ०२, सुसुन्द्री, ता. कळमेश्वर, जि. नागपूर यांचे वर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी निलेश चंदनलालजी जैस्वाल, वय ५२ वर्ष, रा. वैशाली नगर प्लॉट नंबर १४, हनुमान मंदीर जवळ नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बोरी** येथे आरोपी १) नवसु गोपाळा महाजन, वय ४० वर्ष, रा. धवळपेठ, ता. जि. नागपुर २) मुरलीधर देवदास चव्हाण, वय ३८ वर्ष, रा. आसोला सावंगी पारधी बेडा, ता. जि. नागपुर ३) शंकर कवडु पारसे, वय ३४ वर्ष, रा. बुटीबोरी, ता. जि. नागपुर याचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद.

**नमुद कारवाईत एकुण १) ७५ लिटर मोहाफुल गावठी दारू २) १३४८२० मिली देशी दारू आणि वाहन असा एकुण ६६७०४०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने